जा .क्र. तंशिविकापु/आस्था-३(अ)/संघटना/२०२१/ 196

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे – ४११०१६
दिनांक : ११/०१/२०२१
12 JAN 2021

**तात्काळ**

प्रति,

संचालक/प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था/कार्यालय

विषय :- **तंत्रसंघटन आणि तंत्रनिकेतन,अभियांत्रिकी महाविद्यालय व तत्सम संस्था तांत्रिक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या नावाने मान्यता मिळणेबाबत.....**

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र.१२/आस्था(१)/२०२०/१०७, दि. २९/१२/२०२०

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्राचे अवलोकन करण्यात येवून त्यासोबत यांच्या निवेदनातील मुद्येनिहाय माहिती या कार्यालयास **दिनांक १५/०१/२०२१ रोजी पर्यंत सादर करण्यात यावी.** सदरची माहिती विभागीय कार्यालयाच्या **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठवावी.

**सोबत : संचालनालयाचे पत्र**

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. ०२२-६८५५४१२/४३२/४६३/४७८
Email ID – desk१२@dtemaharashtra.gov.in
internet:- www.dtemaharashtra.gov.in

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१

स्पीडपोस्टद्वारे

क्रमांक : १२/आस्था(१)/२०२०/१०७

दिनांक : 29 DEC 2020

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
05 JAN 2021
आवक क्र.......

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : तंत्रसंघटन आणि तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय व तत्सम संस्था तांत्रिक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या नावाने संघटनेला मान्यता मिळणेबाबत

संदर्भ : १) शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकिर्ण-१११९/(१२७/१४)/तांशि-२, दि. २४.०६.२०१९
२) शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकिर्ण १११९/(१२७/१४)/तांशि-२, दि. २०.०७.२०१९
३) संचालनालयाचे पत्र क्र. १२(१)/आस्था/२०१९-२०/१३८, दि. ०९.०३.२०२०
४) शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकिर्ण-१११९/(१२७/१४)/तांशि-२, दि. २९.०९.२०२०

उपरोक्त विषयास अनुसरुन, शासनाने संदर्भ क्र. १ व २ च्या पत्रान्वये मागविलेल्या माहितीच्या अनुषंगाने, संचालनालयाच्या पत्र क्र. १९९, दि. ३०.०९.२०१९ (ईमेलद्वारे) अन्वये संचालनालयांतर्गत सर्व विभागामार्फत माहिती मागविण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र अन्य विभागांकडून/ कार्यालयाकडून संघटना विषयक माहिती निरंक असल्याचे कळविण्यात आले.

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडून प्राप्त झालेली मुद्देनिहाय माहिती व मुख्य कार्यालयाशी संबंधित माहिती संकलित करुन संदर्भ क्र.३ नुसार माहिती शासनास सादर करण्यात आलेली होती. तथापि, सदर माहितीशी संबंधित शासनाच्या संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये (प्रत सोबत जोडली आहे) खालील मुद्यांची माहिती खुलाश्यासह सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तरी, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी संदर्भ क्र. ३ च्या पत्रातील मुद्यांशी संबंधित असलेल्या खालील मुद्यांची माहिती तपासून तपशीलवार खुलाशासह या कार्यालयास **तात्काळ** सादर करावी.

१) सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. संघटना १५१४/प्र.क्र.२५०/१६-अ, दि. १८.०३.२०१५ मधील मुद्यांचे पालन करुन माहिती सादर करावी.
२) कार्यरत संघटनांमधील सदस्य संख्या तपासून तशी माहिती सादर करावी.
३) कार्यरत संघटनांमधील संबंधित संवर्गातील एकूण सदस्य संख्येबाबत माहिती सादर करावी.
४) कार्यरत संघटनांमधील सदस्य हे एकाच संवर्गातील असल्याबाबत खात्री करुन माहिती सादर करावी.
५) सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. आरजीए-२०११/प्र.क्र.८६/११/१६-अ, दि. ०९.०९.२०११ च्या अनुषंगाने आवश्यक ती मुद्देनिहाय माहिती सादर करावी.

Letterssanghatana

उपरोक्त माहिती सादर करण्याबाबत प्रथम प्राधान्य देण्यात यावे. तसेच यापूर्वी ज्या विभागीग कार्यालयांनी संघटनांबाबतची माहिती निरंक कळविली आहे त्या कार्यालयांनी पुनश्च तपासावी. संघटना प्रतिनिधी मंत्रालयीन स्तरावर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा करतात आणि त्या विभागातील संघटनेची माहिती निरंक म्हणून कळविली जाते. ही बाब उचित नाही. त्यामुळे पाठविलेली माहिती प्रमाणित करण्याबाबत याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
अध्यक्ष/सचिव, असोसिएशन ऑफ क्लास थ्री मिनिस्ट्रीयल एम्प्लॉइज ऑफ दि डिपार्टमेंट ऑफ टेक्नीकल एज्युकेशन इन ग्रेटर बॉम्बे, त्यांना कळविण्यात येते की, शासनाच्या संदर्भ क्र. १ व २ च्या पत्राच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संदर्भ क्र. ३ अन्वये शासनास माहिती सादर करण्यात आलेली होती. सदर माहितीच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र. ४ अन्वये मागविलेल्या मुद्यांची माहिती तात्काळ देण्यात यावी. (सुलभ संदर्भासाठी संदर्भ क्र. ३ व ४ च्या पत्राच्या प्रती सोबत जोडण्यात येत आहेत.)

# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-१११९/(१२७/१४)/तांशि-२.
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक — २९ सप्टेंबर, २०२०

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय : तंत्रसंघटन आणि तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय व तत्सम संस्था तांत्रिक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या नावाने संघटनेला मान्यता मिळणेबाबत....**

**संदर्भ :** १. सामान्य प्रशासन विभागाचे १८ मार्च, २०१५ रोजीचे शासन परिपत्रक
२. आपले क्रमांक १२/आस्था(१)/२०१५/७७८, दिनांक १५ मार्च, २०१६ चे पत्र.
३. शासनाचे समक्रमांकाचे दिनांक २० जुलै, २०१९ चे पत्र.
४. आपले क्रमांक १२(१) आस्था/२०१९-२०/१३८, दिनांक ०९ मार्च, २०२० चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्रमांक १ येथे नमूद परिपत्रकाच्या अनुषंगाने तंत्रसंघटन आणि तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय व तत्सम संस्था तांत्रिक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या नावाने संघटनेला मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत संदर्भ क्रमांक ३ येथील पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि, अद्याप पर्यंत संचालनालयाकडून शासनास सुधारित प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. त्याअनुषंगाने खालील मुद्यांचा मुद्देनिहाय खुलासा करून सुधारित प्रस्ताव शासनास सादर करावा, ही विनंती.

१. संदर्भ क्रमांक १ येथे नमूद शासन परिपत्रकामधील मुद्यांचे पालन करून तसा प्रस्ताव शासनास सादर करावा. सदर परिपत्रकान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे असेही प्रस्तावामध्ये नमूद करावे.
२. सद्यस्थितीमध्ये कार्यरत दोन्ही संघटनांमधील सदस्यसंख्या तपासून प्रस्ताव सादर करणे
३. दोन्ही संघटनाच्या अनुषंगाने संबंधीत संवर्गातील एकूण सदस्यसंख्या नमूद करावी.
४. दोन्ही संघटनांमधील सदस्य हे एकाच संवर्गातील असल्याबाबत खात्री करावी.
५. तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक आरजीए-१०११/प्र.क्र. ८६/११/१६-अ, दिनांक ०९ सप्टेंबर, २०११ च्या अनुषंगाने आवश्यक ती मुद्देनिहाय माहिती शासनास सादर करण्यात यावी.

आपला,

(प्रकाश भा. आव्हाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

पत्र प्राप्त झाले
1 OCT 2020
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. 12605
दिनांक 6/10/2020